आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार, दिनांक ०१ ऑक्टोबर २०२३

ठळक बातम्या

1. स्वच्छतेसाठी एक तारीख एक तास एक साथ मोहिमेस देशभरात नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग: महाराष्ट्रात ७२ हजारापेक्षा जास्त ठिकाणी स्वच्छता मोहीम.

2. नागपूरसह विदर्भात स्वच्छता ही सेवा अभियानात उत्साहात श्रमदान.

3. चंद्रपूरच्या ताडोबा -अंधारी व्याघ्र प्रकल्पात नव्या पर्यटन हंगामाची उत्साही सुरुवात.

4. आजपासून ते येत्या ८ ऑक्टोबर दरम्यान खादी आणिग्रामोद्योगी वस्तूंच्या राज्यस्तरीय विक्री आणिप्रदर्शनीचे नागपुरात आयोजन.

********

श्रमदान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार आज देशभरात नागरिकांनी स्वच्छता मोहिमेत मोठ्या प्रमाणात भाग घेतला. महात्मा गांधी यांच्या उद्याच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहण्यासाठी आज सकाळी १० वाजता स्वच्छता मोहिमेसाठी एक तास श्रमदान करण्याचं आवाहन मोदी यांनी नागरिकांना केलं होतं. बाजारपेठा, रेल्वे मार्ग, जलाशय, पर्यटन स्थळं, प्रार्थनास्थळं यासह सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता उपक्रमात सर्व स्तरातले नागरिक सहभागी झाले. नवी दिल्ली इथं भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा, केंद्रीय मंत्री मीनाक्षी लेखी आणि इतर नेते स्वच्छता अभियानात सहभागी झाले होते. या स्वच्छता मोहिमेअंतर्गत देभरातून, शहरी आणि ग्रामीण भागातली ६ लाख ४० हजारांपेक्षा जास्त ठिकाणं श्रमदानासाठी दत्तक घेतली गेली. सुमारे एक लाख निवासी भागांमधे स्वयंसेवक म्हणून मोठ्या संख्येनं रहिवासी कल्याणकारी संघटना श्रमदानासाठी पुढे आल्या. देशभरातली सुमारे ३५ हजार अंगणवाडी केंद्रं दत्तक घेण्यासाठी ग्रामीण भागातले समूह पुढं आले. या अभिनव उपक्रमात भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या जवानांनीही नागरिकांच्या साथीनं विविध ठिकाणांची स्वच्छता केली. राज्यात नागरिकांच्या श्रमदानाने स्वच्छता मोहीम राबवली गेली. नगरविकास विभागानं या मोहिमेचे आयोजन केलं. मुंबईत आज गिरगाव चौपाटीवर उत्साही नागरिक, विद्यार्थी यांच्या जोडीनं राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मान्यवरांनी स्वत: हातात झाडू घेऊन श्रमदान केलं आणि स्वच्छतेसाठी ‘एक तारीख एक तास’ या राज्यस्तरीय मोहिमेची सुरुवात केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वच्छता मोहिमेबद्दल कौशल्य विकास विभागाचं कौतुक केलं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या ३५०व्या वर्षानिमित्त राज्यातल्या ३५०

किल्ल्यांच्या स्वच्छतेला आजपासून सुरुवात झाली असून आयटीआयचे दीड लाख विद्यार्थी यात सहभागी होत आहेत, ही आनंदाची बाब आहे, असं फडणवीस म्हणाले.

********

स्वच्छता अभियान

नागपूरसह संपूर्ण विदर्भात आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या स्वच्छता ही सेवा या अभियाना अंतर्गत 'एक तारीख एक तास श्रमदान' या उपक्रमाचं आयोजन उत्साहात करण्यात आलं. नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमी येथे नागपूरचे महानगरपालिका आयुक्त डॉक्टर अभिजीत चौधरी यांच्या नेतृत्वात दीक्षाभूमी परिसरातून प्लास्टिक, कागद यासह काडी-कचरा गोळा करण्यात आला. स्वच्छता कर्मचाऱ्यांनी वाढलेले गवत कापून परिसर स्वच्छ केला. अमरावती शहरात महानगरपालिकेच्या वतीने साफसफाई अभियान, आरोग्य शिबीर आणि इतर उपक्रम याप्रसंगी राबविण्यात आले. राज्यसभा खासदार डॉ अनिल बोंडे यांनी स्वतः १ तास श्रमदान करून मनपाच्या साफसफाई कर्मचाऱ्यांचा सत्कार केला. चंद्रपूर महानगरपालिकेत सुद्धा शहराच्या १७ प्रभागात विविध चमूंद्वारे सार्वजनिक जागा स्वच्छ केल्या गेल्या. केंद्रीय संचार ब्युरो, क्षेत्रीय कार्यालय नागपूरतर्फे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि लॉयन्स क्लब, नागपूर यांच्या सहाय्याने एक तास गांधी सागर तलाव, चाचा नेहरू बालोद्यान परिसर येथे स्वच्छतेसाठी श्रमदान मोहीम राबविण्यात आली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी, लॉयन्स क्लबचे पदाधिकारी तसेच NCCच्या विद्यार्थ्यांसह विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी साफसफाई मोहिमेत सहभागी झाले होते. विदर्भातील अनेक जिल्ह्याच्या नगर परिषदेमध्ये सुद्धा स्वतः अधिकाऱ्यांनी श्रमदान केले. वाशिमच्या जिल्हाधिकारी भुवनेश्वरी, सहायक जिल्हाधिकारी अपूर्वा बासुर, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे शिक्षक, विद्यार्थी तसेच समाजकार्य महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि कर्मचारी यांनी वाशिम बस स्टँड परिसर स्वच्छ केला. स्वतः जिल्हाधिकारी यांनी तासभर श्रमदान केले. नागपूरमधील विविध केंद्रीय शासनाच्या कार्यालयातर्फे स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्राद्वारे कल्याण ईश्वर शिवमंदिर तेलंगखेडी येथे स्वच्छता करण्यात आली. राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीतर्फे अकादमी आणि अंबाझरी तलावाला लागून असलेला रस्ता स्वच्छ करण्यात आला. केंद्रीय राखीव पोलीस दलातर्फे पोलीस महानिरीक्षक प्रशांत जांभुळकर यांच्या नेतृत्वात लोकमान्य नगर मेट्रो स्टेशन ते अंबाझरी बगीचापर्यंत सफाई अभियान राबविण्यात आले. अमरावतीच्या चिखलदरा येथील गाविलगड फोर्ट तसेच नागपूर जिल्ह्याच्या मनसर येथील उत्खनन जागेवर सुद्धा पुरातत्व सर्वेक्षण खात्यातर्फे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

## ताडोबा -अंधारी व्याघ्र प्रकल्प

चंद्रपूरच्या जगप्रसिद्ध ताडोबा -अंधारी व्याघ्र प्रकल्पात नव्या पर्यटन हंगामाची आजपासून उत्साही सुरुवात झाली.  विधीवत पूजन करून पर्यटकांना व्याघ्र प्रकल्पात प्रवेश देण्यात आला. गेले तीन महिने पावसाळयामुळे व्याघ्र प्रकल्पातील कोअर भाग पर्यटनासाठी बंद होता. पहिल्याच दिवशी देशभरातील व्याघ्रप्रेमी आणि वन्यजीव अभ्यासक ताडोबात दाखल झाले. पावसाळयात बाह्य भागात पर्यटन सुरू होते. मात्र पर्यटकांचा ओढा कोअर भागाकडे असल्याने ते याची प्रतिक्षा करत होते. गेल्या काही काळात ताडोबा व्याघ्र प्रकल्पाच्या बुकिंग वेबसाईटबाबतही अडचणी होत्या; मात्र नंतर प्रकल्प व्यवस्थापनाने या वेबसाईटबाबत तातडीने कारवाई करत साईट आता सुरळीत केली आहे. त्यातील त्रुटी देखील दूर केल्या जात आहेत. यंदा पहिल्या काही दिवसांत अति पावसामुळे रस्ते खराब असल्याने काही भाग पर्यटनासाठी बंद करण्यात आले आहेत.

********

## धनगर आरक्षण

धनगर समाजाला अनुसूचित जमातीमधून आरक्षण देऊ नये, या प्रमुख मागणीसह अन्य मागण्यांसाठी आज आदिवासी समाजाने गडचिरोली येथे चक्काजाम आंदोलन करून सरकारविरोधात घोषणाबाजी केली. यामुळे तब्बल अडीच तास वाहतूक ठप्प होती. शिवाजी महाविद्यालयापासून शेकडो आदिवासींनी इंदिरा गांधी चौकापर्यंत मोर्चा काढला. त्यानंतर चक्काजाम आंदोलन केले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी राज्य आणि केंद्र सरकारच्या विरोधात घोषणाबाजी केली. आ.डॉ.देवराव होळी, माजी आमदार डॉ.नामदेव उसेंडी, डॉ.नामदेव किरसान, कुणाल कोवे, क्रांती केरामी आदींनी चक्काजाम आंदोलनात सहभागी होऊन उपस्थितांना संबोधित केले. सरकारी शाळांचे खासगीकरण आणि कंत्राटीकरण करणारे परिपत्रक रद्द करावे, २०२३ चा नवीन वनसंशोधित आणि वनसंरक्षक कायदा रद्द करावा, पेसा कायदा कडक करून ग्रामसभांना अधिक अधिकार बहाल करावे, जातवैधता प्रमाणपत्र सिद्ध करू न शकणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करावे, इत्यादी मागण्याही यावेळी करण्यात आल्या. तहसीलदारांना निवेदन दिल्यानंतर चक्काजाम आंदोलन समाप्त करण्यात आले.

********

## ज्येष्ठ नागरिक दिन

नागपूरच्या श्रध्दानंदपेठ परिसरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनात आज सकाळी जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, उपायुक्त तथा सदस्य जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती सुरेंद्र पवार, महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले, समाज

कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त डॉ.सिध्दार्थ गायकवाड, सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांच्यासह जिल्ह्यातील विविध भागातून आलेले ज्येष्ठ नागरिक यावेळी उपस्थित होते. सामाजिक न्याय भवनात आयोजित कार्यक्रमाच्या माध्यमातून पदयात्रा, प्रभात फेऱ्या, सभा, विशेष कार्य केलेल्या ज्येष्ठांचा आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी काम करणाऱ्या अशासकीय संस्थांचा सत्कार, गौरव, आरोग्य शिबीर, चर्चासत्र आणि परिसंवाद आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

********

<u>खादी ग्रामोद्योग वस्तूंच्या प्रदर्शनाचे उद्घाटन</u>

महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आजपासून ते येत्या ८ ऑक्टोबर दरम्यान खादी आणि ग्रामोद्योगी वस्तूंच्या राज्यस्तरीय विक्री आणि प्रदर्शनीचे उद्घाटन आज महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रविंद्र साठे यांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने नागपूरच्या सीताबर्डी येथील रामगोपाल माहेश्वरी सभागृहात प्रदर्शन आणि विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटनप्रसंगी महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विपीन जगताप, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी प्रदीप चेचरे यांच्यासह खादी आणि ग्रामोद्योग मंडळाचे विदर्भातील विविध जिल्ह्यातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. प्रदर्शनाला भेट देणाऱ्या ग्राहकांसाठी रात्री सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानीही असणार आहे. हे प्रदर्शन सकाळी 10 ते रात्री 10 वाजेपर्यंत नागपूरकरांसाठी नि:शुल्क खुले असणार आहे.

********

<u>आधार बायोमेट्रीक</u>

शेतकऱ्यांना देण्यात येणारी मदतीची रक्कम विनाविलंब मिळण्यासाठी बँक खाते आधारशी लिंक करावे, तसेच आधार बायोमेट्रीक अपडेट करावे, असे आवाहन बुलढाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांचे बँक खाते आधारशी लिंक नसल्यामुळे आधार प्रमाणीकरण करूनही बँक खात्यात रक्कम जमा झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच काही शेतकऱ्यांचे आधार निष्क्रिय झाले आहे. ज्या शेतकऱ्यांच्या आधारला दहा वर्षे झाले असून त्यांनी आधारमध्ये कोणतेही अपडेट केलेले नाही, त्यांनी सर्वप्रथम आधार केंद्रातून आधार बायोमेट्रीक अपडेट करावे लागणार आहे.

********

आशियाई क्रीडा

चीनमधे हँगझोऊ इथं सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत आज आठव्या दिवशी भारतानं आणखी एक सुवर्णपदक आणि दोन रौप्य पदकांची कमाई केली. नेमबाजीत पुरुषांचा सांघिक ट्रॅप प्रकारात किनार दार्यस, जोरावर सिंग संधू आणि पृथ्वीराज तोंडायमन यांच्या संघानं ३६१ अंकांची कमाई करत सुवर्णपदक पटकावलं. वैयक्तिक पात्रता फेरीत या तिघांनीही अंतिम फेरीत धडक मारली आहे. महिलांच्या ट्रॅप प्रकारात मनीषा कीर, प्रीती रजत आणि राजेश्वरी कुमारी यांना भारताला रौप्यपदक मिळवून दिलं. त्यांच्यापैकी फक्त मनीषा कीर अंतिम फेरीसाठी पात्र ठरली. महिलांच्या वैयक्तिक गोल्फ स्पर्धेत अदिती अशोकनं रौप्यपदक पटकावलं. या स्पर्धेत भारतानं आतापर्यंत, ११ सुवर्ण, १६ रौप्य आणि १४ कांस्य पदकांसह एकूण ४१ पदकांची कमाई केली आहे. पदकतालिकेत भारत सध्या चौथ्या स्थानावर आहे.

********

हवामान

नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवलेल्या अंदाजानुसार पुढील दोन दिवसांत संपूर्ण विदर्भात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

******